# महात्मा फुले –एक कृतिशील समाजसुधारक


प्रा. डॉ. बाळासाहेब नानासाहेब देवकाते

इतिहास विभाग प्रमुख, दादा पाटील महाविद्यालय, कर्जत, जि. अहमदनगर

1969.balasaheb@gmail.com Mob. 9860423664


**प्रस्तावना :**

महाराष्ट्राला फार मोठा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. या महाराष्ट्राच्या कुशीत अनेक नवनवीन समाजसुधारक होऊन गेले. महात्मा फुले, आगरकर, न्या. रानडे, महर्षी शिंदे, शाहू महाराज, महात्मा गांधीजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची नावे गौरवाने घ्यावी लागतात. समाजातील सामाजिक, आर्थिक, धार्मिक, अंधश्रद्धा, रूढीपरंपरा, सामाजिक विषमता दूर करण्याचा या समाजसुधारकांनी प्रयत्न केले. आधुनिक भारतातील पहिले क्रांतिकारक म्हणून महात्मा फुले यांना ओळखले जाते. समाजसेवेच्या ध्येयाने प्रेरित होऊन आपले सारे जीवन समाज उध्दारासाठी समर्पित केले होते. ते सामन्यातील सामान्य असले तरी विचाराने व कर्तुत्वाने असामान्य होते. सामाजिक विषमतेविरूध्द त्यांनी बंड पुकारले होते. समतेसाठी त्यांनी शूद्रातिशूद्रांना संघटीत करण्याच्या प्रयत्न केला. शिक्षण व समता या दोन शब्दात त्यांच्या कार्याचे यथोचित वर्णन करता येईल. हे नुसते बोलघेवडे सुधारक नव्हते तर कर्ते सुधारक होते.

महात्मा फुले बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी अविरत झगडणारे महाराष्ट्राचे मार्टिन ल्युथर म्हणून ते सुपरिचित आहेत. स्त्रियांच्या व अस्पृश्यांच्या उध्दारासाठी चंदनासारखेते झिजलेले. इ. स. १८१८ मध्ये पेशवाईचा अस्त होऊन ब्रिटिश राजवट महाराष्ट्रात सुरु झाली. त्यामुळे सामाजिक, आर्थिक विषमता कमी होण्यास मदत झाली. त्याच काळात शिक्षणावर सनातन्यांच्या मक्तेदारी होती. इतर अस्पृश्य समाज शिक्षणापासून वंचित होता. त्यांना दिशा देण्याचे काम महात्मा फुले यांनी केले. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उध्दारी' या उक्तीप्रमाणे त्यांनी पुण्यात इ. स. १८४८ साली भिडे वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरु केली. या मुलींना शिकविण्याचे काम क्रांतीज्योती सावित्रीबाईने केले.[१] हे करीत असताना त्यांना अनेक समाजकंटकानी निर्माण केलेल्या संकटांना सामोरे जावे लागले. शेण टाकणे, चिखल फेकणे, टिंगल टवाळी करणे यासारख्या वाईट गोष्टीचा सामना करावा लागला होता. तरीही त्यांनी न डगमगता आपले काम अखंडपणे चालू ठेवले. 'मुलगी शिकली तर धर्म बुडेल' अशी समजूत सनातनी मंडळीची होती.

जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले ।।
तोचि साधू ओळखावा । देव तेथेच जाणावा ।।

वरील उक्तीस अनुसरून महात्मा फुले म्हणतात 'प्राणातिही दीनदुबळ्या व अविद्येने रंजल्या गाजल्या अस्पृश्य समाजाची सेवा करण्याची व्रत सोडून द्यावयाचे नाही' असा दृढ निश्चय केला होता.[३] आणि अखेरच्या क्षणापर्यंत तसाच चालू ठेवला.

महात्मा फुले यांनी महाराष्ट्रातील सांस्कृतिक परंपरेच्या माध्यमातून सत्य शोधून काढून लोकांसमोर खऱ्या सांस्कृतिक व्यवहाराचे दर्शन घडविले. बळीराजा हा लोकपरंपरेतील राजाच्या संदर्भात तत्कालीन समाजातील ब्राह्मण आणि इतर कष्टकरी जातींमध्ये कशी वेगळी सांस्कृतिक परंपरा होती याचा आधार देवून मांडणी केलेली दिसते. 'गुलामगिरी' या ग्रंथात महात्मा फुले म्हणतात, 'त्या दिवसापासून आजतागायत पित्राच्या कित्येक कुळात दरवर्षी अश्विनमाशी विजयादशमीस त्याच्या स्त्रियांनी कणकेचा किंवा तांदळाचा बळी दाराच्या उंबऱ्यावर ठेवलेला दिसतो. त्याच्या उरावर डावा पाय देऊन त्यास आपट्याच्या काठीने त्याचे पोट फोडीतात, नंतर त्यास ओलांडून घरात शिरतात,' वहिवाट सापडते. दुसऱ्या बाजूला याच समाजातील पूर्णपणे विरोध असलेली सांस्कृतिक वहिवाट ते पुढे आणतात. त्याच्या स्त्रियांनी दुसरा बळी येऊन देवाचे राज्य स्थापिले. याविषयी भविष्य जाणून घेऊन त्यांनी आपल्या उंबऱ्यात उभ्या राहून त्यास ओवाळून म्हणतात की, 'इडा पीडा जावो बळीचे राज्य येवो' या दिवसापासून आजतागायत शेकडो वर्षे लोटली तथापि बळीच्या राज्यातील कित्येक भागात क्षत्रिय वंशाच्या स्त्रियांनी दरवर्षी अश्विन शुद्ध दशमीस संध्याकाळी आपापल्या पतीस व पुत्रास ओवाळून पुढे येणाऱ्या बळीचे राज्य यावे म्हणून इच्छिण्याचे अद्याप सोडले नाही. (फुले सर्व शुद्रातिशुद्रांना क्षत्रिय म्हणत असत, याची नोंद घ्यावी) बळीराजाच्या मागे सांस्कृतिक परंपरा व कारणपरंपरा होती. महाराष्ट्रातील शेतकऱ्याला बळीराजा म्हणण्याची परंपरा प्रथा आहे.

महाराष्ट्रातील शेतकऱ्यालाच बळीराजा म्हणण्याची प्रथा



Scanned with CamScanner

आहे. राबणार व शोषित जातीचे शेतकऱ्यांचे शोषण सावकार मंडळी कसे करतात. इंग्रज त्यांना कसे मदत करीत होते. मुख्यतः गुजर-मारवाडी, ब्राम्हण हे लोक सावकारीचा व्यवसाय करून शेतकऱ्यांना पैसा पुरवित असत. ब्रिटिश राजवट येण्याअगोदर सावकार व शेतकरी यांचे संबंध चांगले होते. परंतु ब्रिटिश राजवटीचा काळ सुरू झाल्यामुळे सावकाराचे भलतेच साधले. बि-बियाणे, बारदाने , बैल घेण्यासाठी नड पडली की, शेतकरी सावकाराचे दार ठोठावतो. भरमसाठ व्याजाने कर्ज घेत असतो. शूद्र शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा व देवभोळेपणाचा फायदा घेऊन सावकार शेत जमिनीवरचा माल व्याजापोटी हडप करीत होते. पुढे त्यांच्या अडाणीपणा फायदा घेऊन दामदुपट्टीने व्याज गहाण म्हणून ठेवलेल्या जमिनीवर ते आपला कब्जा ठेवीत. त्याच जमिनीच्या मूळ मालकास कूळ म्हणून राबवित. अशाप्रकारे सावकारशाहीतून जमीनदार तयार होत. कर्जबाजारी शेतकऱ्यांची सावकाराकडून शोषण होत होते. याचे वर्णन महात्मा फुले यानी पुढील शब्दात केले आहे.

हिशेबी घोळ सर्व गोंधळ । वाढवी कर्ज डोईवर ।
आतुन होई सावकार ।।
पैसा देई गहाणावर । वेळ पाहून संधी साधून ।
मागणी नेट व्याजावर ।।
तगादा धाडे पाठीवर । दामदुप्पट सर्व एकवट ।
नोंदणी गहाणखतावर दुमाला पुस्त रजिस्ट्रर ।।
हा सावकार आपले पोट व्याजावर जाळतो.
हातावर देई ।
लेहुने घेई वायदा आट स्टँपावर ठोकली आर्जी अखेर।
धन्यावर जीव। केली मोठी कीव।
बक्षीस बिनभाडे घर।[४]

शेतकऱ्यांना लुटण्यासाठी सावकार वेगवेगळे छक्के पंजे लावतात. हे सावकार आडणी अक्षरशून्य शेतकऱ्यांना सांगतात सरकारी कायद्याप्रमाणे तुम्हास गहाण खतावर पैसे देता येणार नाहीत. त्यासाठी तुम्ही जे आपले शेत आम्हास खरेदी करून द्याल आणि आम्ही तुम्हास कर्ज देऊ व तुम्ही आमच्या रुपयाची फेड केल्यावर आम्ही तुमची शेते परत खरेदी करून तुमच्या ताब्यात देऊ अशा शपथीची बोली असे. प्रतिनिधित्व बळीराजा या प्रतिकाने केलेले दिसते. हे परंपरेवरून जाणवले.[५] आपल्या गुलामगिरी या ग्रंथात महात्मा फुले यांनी असूर, दस्यू, राक्षस, आदिवासी यासारख्या सर्व परंपरा या मूळच्या भारतीय शूद्र आणि अतिशूद्र जातीच्या परंपरा मानल्या आहेत.

हिदुस्थान हा शेतीप्रधान देश आहे. देशाची समृद्धी व भरभराट शेतकऱ्यांवर अवलंबून होती. पण भारतीय शेतकरी सुखी व समाधी नव्हता. दुःखी दरिद्री, कर्जबाजारी, कंगाल बनला होता. भटब्राम्हण शेतकऱ्याची कशी फसवणूक करतात. शिक्षणाशिवाय या समाजाची प्रगती होणार नाही. त्यासाठी महात्मा फुले यांनी शिक्षणाचा पुरस्कार केला होता. 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथात याचे विदारक चित्रण त्यांनी पुढील शब्दात केले आहे. 'विद्येविना मती गेली, मतीविना नीति गेली, नीतिविना गती गेली, गतीविना वित्त गेले, वित्त विना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले.'

शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण द्यावे. सरकारने त्यासाठी खास प्रयत्न करावेत. शेतकऱ्यांच्या मुलांसाठी वसतिगृहे काढावीत, व्यावसायिक शिक्षण द्यावे कनिष्ठ वर्गातील लोकांना नोकऱ्यात प्राधान्य द्यावे. अशा सूचना त्यांनी केल्या आहेत. शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीच्यावेळी सर्वोतोपरी मदत करावी असा आग्रह धरला होता.[६] इ. स. १८७७ च्या दुष्काळाच्या वेळी दुष्काळ पिडीतांना मदत करण्यासाठी त्यानी पुढाकार घेतला होता. धनकवडी येथे दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांसाठी खास शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हिंदूस्थानच्या भेटीवर 'ड्यूक ऑफ कनॉट' आले होते. त्यांचा सन्मान करण्याचा ठराव पास झाला. या समारंभाचे निमंत्रण महात्मा फुले यांना होते. ते शेतकऱ्याच्या वेशात गेले. डोक्यास मुंडासे, साधा अंगरखा, खांद्यावर घोंगडी, हातात काठी व पायात फाटक्या वहाणा घालून भेटीस गेले. बोलण्याची संधी मिळाली तेव्हा ते म्हणाले ''ड्यूकसाहेब याठिकाणी उत्तमोत्तम पोशाख करून उपस्थित असलेले हे लोक हिंदूस्थानच्या जनतेचे प्रतिनिधी नाहीत. या देशातील बहुसंख्य जनता शेतकरी आहे आणि ते जो पोशाख वापरतात त्याच पेहरावात मी त्यांचा प्रतिनिधी म्हणून आपल्या भेटीस आलो आहे. हिंदुस्थानच्या या बहुसंख्य जनतेचे हित तुम्हाला करावयाचे असेल तर त्यांचे अज्ञान घालवा. त्यांना प्राथमिक शिक्षण मोफत मिळण्याची सोय करावी. लाखो लोकांचा प्रतिनिधी म्हणून माझा निरोप सांगा.''

महात्मा फुले यांनी शेती संदर्भात काही नवीन उपाय सुचविले.

शेतीची मशागत चांगली व्हावी यासाठी गाय, बैलाच्या जातीची पैदास चांगली होण्यासाठी सरकारने परदेशातून गाईचे बेणे आणावे.



Scanned with CamScanner

शेतीचा पोत सुधारण्यासाठी पालापाचोळा, कुजलेले खत, मिश्रण इत्यादी वाहवून देवू नये. यासाठी शेतामध्ये तालीवजा, बंधारे बांधावीत. वळवाचे पाणी शेतात मुख्यतः मुरून नदी नाल्यास गेल्यामुळे शेतीची सुपिकता वाढण्यास मदत होते.

जंगली जनावरांपासून शेतकऱ्यांच्या पिकांचे संरक्षण करण्यासाठी गावठी टोड्यांच्या बंदुका शेतकऱ्यांना द्याव्यात.

शेतकऱ्यांच्या मुलास लोहारी, सुतारी कामाचे तास निश्चित करावेत.

शंभर रूपयाच्यावरील पगारी असणाऱ्या अंमलदाराचे पगार कमी करावेत. त्याच्या पेनशनी कमी कराव्यात. मात्र शेतमजूर, कारागीर, लोहार, सुतार, बिगरी यांचे पगार कमी करु नयेत.

शेतकऱ्यांच्या मुलास पाठ्यपुस्तके, पेन्सिल तसेच शेतकऱ्यास शेती सुधारण्यासाठी शेतीसंबंधीचे सर्व ज्ञान देणारे ग्रंथ मिळवून द्यावेत.

शेतकी शाळा स्थापन करावीत.[७]

महात्मा फुले यांनी आपले सारे आयुष्य पददलित जनतेच्या व बहुजन समाजाच्या उद्धारासाठी खर्च केले. सामाजिक अन्याय विषमता या विरुध्द त्यांनी आवाज उठविला. इ. स.१८७३ साली 'गुलामगिरी' हे पुस्तक गुलामगिरी विरुद्ध लढणाऱ्या अमेरिकन नागरिकांना अर्पण केले. यातून त्यांची वैचारिक जागृती दिसून येते.

समाजकार्याच्या क्षेत्रात ते आघाडीवर होते. सत्य, समता, मानवतावाद या शिकवणुकीवर त्यांचा भर होता. ते कर्ते सुधारक होते. कृतीला त्यांनी महत्व दिले होते. 'सार्वजनिक सत्यधर्म' हा त्यांचा शेवटचा ग्रंथ होता. आणि त्याला मरणोत्तर १८९१ साली तो प्रकाशित झाला. या ग्रंथात त्यांनी सर्वधर्म भेदाच्या पलिकडे जाऊन सत्य हाच एकमेव धर्म असल्याचे प्रतिपादन करून विश्वकुंटूबवादाचा जाहिरनामाच आपणासमोर मांडला आहे.

ब्रिटिश शासनात ब्राह्मण तरूणांनी मामलेदार, कुलकर्णी, तलाठी यासारखी पदे प्राप्त करून घेतली. सरकारच्या वेगवेगळ्या खात्यात ब्राह्मण समाजाने शिरकावा केला होता. आपल्या छोट्या मोठ्या आलेल्या सत्तेचा वापर त्यांनी तथाकथित शूद्रातिशूद्रांवर अन्याय करण्यासाठीच अधिक केला. महात्मा फुले सात्विक संतापाने त्याचा उल्लेख कलम कसाई, ग्राम राक्षस अशा शेलक्या शब्दात करतात. महाराष्ट्रात शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणारा समाजसुधारक अस्पृश्यांच्या मुलांसाठी शाळा उघडून त्यांना शिक्षणाचे दरवाजे खुले करणारा पहिला दलितोद्धारक, हिंदू शेतकऱ्यांची दुःख वेशीवर टांगणारा पहिला शेतकऱ्यांचा कैवारी, शूद्रातिशूद्र बहुजन समाजाच्या वेदनांना वाचा फोडणारा बहुजन समाजातील पहिला नेता अशा अनेक विशेषणाने त्यांचा गौरव केला जातो.[८] धनंजय कीर म्हणतात की, 'जोतिबाचे नाव जोती आणि जोती म्हणजे ज्योत त्या ज्योतिने सामाजिक समता, मानवता आणि विवेकवाद यावर प्रकाश टाकून राष्ट्रास खरा मार्ग दाखवला. बहुजन समाजाच्या व अस्पृश्यांच्या उद्धारासाठीच झटले. समाजात धार्मिक, सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केला.'

**सरांश** – महाराष्ट्रातील समाजसुधारणेच्या इतिहासात प्रत्यक्ष, कृतीची जोड देवून समाज उद्धाराचे कार्य केले. स्त्रियांना शिक्षणाची संधी मिळवून दिली. त्याचप्रमाणे अस्पृश्य वर्गातील लोकांसाठी शाळा उघडून त्यांना ज्ञानाचा प्रकाश दिला. शेतकरी, कष्टकरी वर्गाचे दोन दुःखवेशीला टांगली. त्याच्यातील अज्ञान, धर्म भोळेपणा, रूढी परंपरा याला फाटा देवून शिक्षणाचा मार्ग त्यास खुला करून दिला. ते खरोखर महान होते. मुंबई ला मुक्कामी असताना मुंबईच्या लोकांनी महात्मा फुले यांना 'महात्मा' ही पदवी बहाल केली होती. एकोणिसाव्या शतकात सामाजिक समतेची बीजे, शिक्षणाची गंगा घरोघरी नेण्याचा महात्मा फुले, शाहू महाराज, वि. रा. शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व कर्मवीर भाऊराव पाटील या समाजसुधारकांच्या सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील योगदान अमूल्य असे आहे.

**तळटीपा :**


१) भिडे जी. एल., पाटील एन. डी., महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, फडके प्रकाशन कोल्हापूर, १९९८ पृष्ठ ६९.
२) उपरोक्त, पृष्ठ ७२.
३) पाटील पी. एस., महात्मा फुले यांचे चरित्र, १९२७, पृष्ठ २६.
४) चौसाळकर अशोक, महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ, नोव्हेंबर २००३ पृष्ठ २८, २९.
५) उपरोक्त, पृष्ठ ४२, ४३,
६) पाटणकर भारत, महात्मा फुले आणि सांस्कृतिक संघर्ष, २००३, पृष्ठ ५.
७) सागर के., महाराष्ट्रातील समाजसुधारक, २०१० पृष्ठ ८०, ८१.
८) भिडे जी. एल., पाटील एन. डी., महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, १९९८ पृष्ठ ८४.


●●●



Scanned with CamScanner